स्थायी समितीच्या शनिवार दिनांक 23–06–2012 रोजी दुपारी 12–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 9. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 10. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 11. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 12. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 13. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 14. | सौ. अल्का अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 2. | सौ. जैस्वाल हर्षला संजय | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. रविन्द्र कुभांरे, अति. उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 68 :– भगवान नगर मराठी प्राथ. शाळा, बॅनजी ले–आऊट, नागपूर ही मनपाची शाळा बंद स्थितीत असून शाळा इमारत किरायाने उपलब्ध होण्याकरिता अर्जदार रुकमन पात्र मेमोरियल सोसायटी, नागपूर तर्फे रश्मी भारव्दाज 178, आदिवासी कॉलनी, नागपूर यांना शाळा इमारत किरायाने मागितल्यानुसार त्यांच्या संस्थेस उपरोक्त शाळा मासिक किराया रु. 24,800/– प्रमाणे शाळेच्या इमारतीमधील तळ मजल्यावरील तीन रुम व पहिल्या मजल्यावरील तीन रुम असे एकुण सहा खोल्या देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाचा धोरणात्मक निर्णय झाल्यावर जो दर सभागृह ठरविल त्या प्रमाणे मासिक किराया दयावा लागेल या अटीवर विषय एकमताने मंजूर तसेच तो पर्यंत कार्यालयाने प्रस्तावित मासिक किराया वसुल करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 69 :– हिवरी ले–आऊट प्राथमिक (बंद असलेल्या) म.न.पा. शाळेची रिकामी इमारत रु. 19,000/– (एकोणविस हजार रुपये) प्रमाणे (तात्पुरते) तीन वर्षाकरीता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर शहर (पूर्व) यांना शासकीय कार्यालयासाठी किरायाने देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाचा धोरणात्मक निर्णय झाल्यावर जो दर सभागृह निश्चित ठरवेल त्या प्रमाणे मासिक किराया दयावा लागेल तसेच तो पर्यंत कार्यालयाने प्रस्तावित मासिक किराया वसुल करण्याच्या अटीवर विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 70 :– नागपूर महानगरपालिकेच्या सिमेअंतर्गत व सिमेपलीकडे नव्याने स्थापीत होणाऱ्या उंच इमारतीचे बांधकामाकरीता नगर रचना विभाग, म.न.पा. आणि नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांच्याकडे इमारतमालक/बिल्डर/डेव्हलपर्स यांच्याकडून गगनचुंबी (उंच) इमारतीचे नकाशाची मंजूरी मिळण्याकरीता अर्ज वेळोवेळी प्राप्त होत असल्याने अशा उंच इमारतीत आगीच्या घटना घडल्यास अशावेळी अग्निशामक विभागात आग विझविणारी यंत्रणा तांत्रिक दृष्टया सक्षम करण्याकरीता, अग्निशमन विभागाचे बळकटीकरण करण्याकरीता व संभाव्य आगीपासून बचाव करण्याच्या उद्देशाने नविन आधुनिक अग्निशमन यंत्रणा खरेदी करण्याच्या दृष्टीने नियमित आकारण्यात येणारे शुल्का व्यतीरीक्त खालील प्रमाणे उंच इमारत निधी आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आकारण्यात येणारे शुल्क खालील प्रमाणे.

| Sr. | Types of | Building height (mtrs) | Rates for High rise building Fund |
|---|---|---|---|

| No. | Building | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | Residential, Educational, Institutional, Assembly, Business, Mercantile Building | | Rate per Sq.mtr. | Maximum High rise building Fund |
| | | 25 mtrs to 30 mtrs. | 1076 per Sq.mtr. | 25,00,000/- |
| | | 30 mtrs to 45 mtrs. | 1614 per Sq.mtr. | 75,00,000/- |
| | | 45 mtrs to 60 mtrs. | 3228 per Sq.mtr. | 1,50,00,000/- |
| | | 60 mtrs to 75 mtrs. | 4842 per Sq.mtr. | 2,00,00,000/- |

उपरोक्त शुल्काची आकारणी दि. 27.02.2012 पासून मा. आयुक्त, म.न.पा. यांच्या मंजूरी आदेशान्वये दि. 01.03.2012 पासून शुल्क आकारण्यात येत असून वित्तीय वर्ष सन 2012.13 आय बजट प्रावधान क्र. 25, "उंच इमारत निधी" शिर्षक आय बजट प्रावधान अंतर्गत उघडण्यात आलेले आहे आणि रु. 2,27,00,000/– आय प्राप्त झालेली असून मा. अध्यक्ष स्थायी समिती यांना विनंती की सदर ठरावाची स्थायी समिती समोर नोंदणी व कार्योत्तर मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उपरोक्त विषय सभागृहाच्या मंजूरी करिता पाठविण्याची शिफारस करण्यांत येते तो पर्यंत आकारण्यांत येणाऱ्या शुल्क वसुलीस म.न.पा. सभागृहाची मंजूरी मिळे पर्यंत स्थगिती देण्यासह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 71 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /– हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /– दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर